| | |
|---|---|
| MHKO110003272014 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक १०३/२०१४ मधील निशाणी क्र. १०१ वरील आदेश ( श्रीमती लक्ष्मीबाई बाबुराव खोंद्रे वगैरे विरुध्द श्री.बाजीराव बाबुराव खोंद्रे वगैरे )** |

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक १० –ब चे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचा अर्ज व त्यावर प्रतिवादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंनी त्यांच्या अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केलेला आहे.

३. वादी यांचे असे कथन आहे की , वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन तुटक कब्जा मिळणेकरीता व दरम्यानच्या काळात प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे नविन बांधकाम करु नये व कायम मनाई होऊन कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे . त्यानंतर प्रतिवादी क्रमांक १०–ब विनोद शामराव खोंद्रे हे दिनांक २६.०६.२०२१ रोजी सनराईज हॉस्पीटल,कोल्हापूर येथे मयत झाले आहेत . प्रस्तुत कामी प्रतिवादी क्रमांक १० –ब चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी विलंब झालेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्रमांक १० –ब चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. वारस रेकॉर्डवर आणणेसाठी११ महीने ०५ दिवसांचा विलंब हा प्रतिवादी क्रमांक १० –ब हे मयत झालेची माहीती वेळेत न

मिळालेने. तसेच मृत्यू नोंद दाखलासुध्दा वेळेत न मिळालेने मुदतीत प्रतिवादी क्रमांक१० –ब चे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर झालेस वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच दावेचे कामी गुंतागुंत निर्माण होवून वादी यांना विनाकारण न्यायापासून वंचीत रहावे लागणार आहे.

४. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की , यातील वादी व प्रतिवादी हे एकमेकांचे नातलग असून वादींना प्रतिवादी क्रमांक १० –ब हे मयत झाले आहेत याची माहीती असूनही त्यांनी जाणूनबुजून विलंब केला असलेने. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन तुटक कब्जा मिळणेकरीता व दरम्यानच्या काळात प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचे नविन बांधकाम करु नये व कायम मनाई होऊन कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे सदर दाव्यात प्रत्येक पक्षकार हा आवश्यक पक्षकार म्हणून सामील असणे गरजेचे आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्रमांक १० –ब चे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्याकरीता वादी यांनी केलेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्रमांक १० –ब चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे.

वादीनी प्रतिवादी क्रमांक १० –ब चे वारस रेकॉर्डवर घेणेस जाणूनबुजून उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे वादी यांना त्याचेवर त्यांनी केलेल्या उशीरासाठी खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होणार नाही. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**– आ दे श –**

वादी यांचा निशाणी क्र. १०१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2022.11.28 11:37:08 +0530

ठिकाण – पेठवडगांव　　(एस.डी.शिरसाट)

दिनांक– २३/११/२०२२　　दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.

पेठवडगांव